प्रकाशन: 02/जानेवारी2025

अटी आणि शर्ती

या अटी आणि शर्ती ("अटी आणि शर्ती") एचडीएफसी बँक लिमिटेडने ("एचडीएफसी बँक" किंवा "बँक") दिलेल्या ईगिफ्टप्लस प्रिपेड कार्ड्सना (इथे नंतर परिभाषित केल्याप्रमाणे) लागू होतात आणि त्यांचे नियमन करतात. या अटी आणि शर्ती एचडीएफसी बँकेने वेळोवेळी दिएल्या इतर अटींच्या व्यतिरिक्त असतील आणि त्यांचा अपमान करणार नाहीत

या अटी आणि कोणत्याही जोडण्या किंवा सोबत असलेल्या पुरवण्यांमध्ये देखील अटी व शर्तींचा समावेश असेल ज्या एचडीएफसी बँकेच्या वेबसाइटवर दिल्या आहेत (ज्यांना एकत्रितपणे "अटी" म्हटले जाईल) आणि त्या गिफ्टप्लस प्रिपेड कार्डचे नियमन करतील.

खालील अटी आणि शर्ती एकत्रितपणे ईगिफ्टप्लस प्रिपेड कार्डाच्या (इथे नंतर परिभाषित केल्याप्रमाणे) सर्व नोंदण्यांना आणि वापरांना लागू असतील. ईगिफ्टप्लस प्रिपेड कार्डाचा आणि/किंवा सेवांचा (इथे नंतर परिभाषित केल्याप्रमाणे) कार्डधारकाने केलेला कोणताही उपयोग इथे नमुद केलेल्या अटी व शर्तींचा स्वीकार समजला जाईल ज्यात नोंदणीसाठी व ईगिफ्टप्लस प्रिपेड कार्डाचा उपयोग करण्यासाठीच्या अनुमतीचा समावेश होतो.

1. व्याख्या

विषय किंवा मजकूराशी विसंगत नसेपर्यंत खालील कॅपिटलाइझ्ड संज्ञांचा असा अर्थ असेल:

"खाते" म्हणजे कार्डधारकाचे एचडीएफसी बँकेत असणारे कोणतेही बचत/चालू खाते होय;

"अॅलर्ट्स" म्हणजे शॉर्ट मेसेज सर्व्हिस (एसएमएस) म्हणून पाठवलेले कस्टमाइझ मेसेज किंवा इलेक्ट्रॉनिक मेलद्वारे संदेश म्हणून किंवा कोणत्याही सोशल मीडिया किंवा इतर कोणत्याही मंचावरुन पाठवलेले कोणतेही मेसेज जे कार्डधारकाला अनुमतीच्या किंवा निश्चित केलेल्या सूचनांच्या आधारावर पाठवले जातात किंवा कार्डधारक आणि/किंवा एचडीएफसी बँकेद्वारे प्लेस केले जातात.

"लागू असलेला कायदा" म्हणजे कोणताही कायदा, स्टॅट्यू, लेजिसलेशन, दुय्यम कायदे, नियमन, अधिनियमन, अध्यादेश, करार, नियम, निर्णय, आदेश, अवॉर्ड, डिक्री, उप-कायदे, सामान्य कायद्याचे नियम, मंजुरी, निर्देश, डिरेक्टिव्ह्ज, मार्गदर्शक तत्वे, धोरण, परवाने, आवश्यकता, किंवा कोणतेही शासकीय प्रतिबंध किंवा अट ज्यामध्ये तशाच स्वरूपाचा कोणताही निर्णय, किंवा डिटर्मिनेशन, अर्ज किंवा कार्यान्वय, किंवा कोणतेही भाष्य किंवा घोषणेचा समावेश असतो, जिच्यावर शासकीय प्राधिकरणाचा कायदेशीर प्रभाव असतो, ज्याचे प्रश्नातल्या प्रकरणावर अधिकारक्षेत्र असते, मग ते त्या दिनांकाला किंवा त्यानंतर परिणामित असो, वेळोवेळी फेरबदल केलेले, बदललेले, रि-एनॅक्ट केलेले, सबसिट्यूट केलेले, फेरफार केलेले असो.

"अर्जदार" म्हणजे अशी व्यक्ती जी कार्डधारकाला एचडीएफसी बँकेने ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड देण्यासाठी अर्ज करते;

"अर्ज" म्हणजे अर्जदाराने कार्डधारकाला ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड देण्यासाठी अर्जदाराने पूर्णपणे भरलेला आणि प्रस्तुत केलेला अर्ज, ज्यामध्ये सर्व जोडपत्रे आणि आदेश समाविष्ट असतात;

"कार्ड असोसिएशन" म्हणजे व्हिसा, मास्टरकार्ड, रुपे, डायनर्स, डिस्कव्हर किंवा बँकेने वेळोवेळी निर्दिष्ट केलेला इतर कोणत्याही कार्डाचा सहयोग होय;

"कार्ड बॅलन्स" म्हणजे ई-गिफ्टप्लस प्रीपेड कार्डवर वेळोवेळी भरलेली वापरात न आणलेली उपलब्ध शिल्लक होय; "कार्डधारक" म्हणजे अशी व्यक्ती जिला एचडीएफसी बँकेने ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड दिले आहे जे अशा व्यक्तीला ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड देण्यासाठी अर्जदाराने प्रस्तुत केलेल्या अर्जावर आधारलेले आहे;

"ग्राहक सेवा" म्हणजे एचडीएफसी बँकेने कार्डधारकांना ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डशी संबंधित कोणत्याही प्रश्नांसाठी उपलब्ध करुन दिलेली टोल-फ्री टेलिफोनिक ग्राहक सेवा सुविधा, हा नंबर ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डच्या मागे किंवा बँकेने वेळोवेळी सक्षम केलेल्या इतर कोणत्याही ग्राहक सेवा सुविधेच्या मागे दिलेला असतो;

"डेटा" म्हणजे सर्व व्यक्तीगत डेटा, व्यवहाराचा डेटा, डेरिव्हेटिव्ह डेटा, इतर कोणतीही माहिती इ., जी कार्डधारकाशी निगडित असते ज्यामध्ये खालील गोष्टींचा समावेश असतो (मागील उत्पादनांच्या संबंधात):

(a) नो युअर कस्टमर (केवायसी)/अँटी मनी लॉंडरिंग डेटा(एएमएल) डेटा;

(b) संबंधादरम्यान किंवा कोणत्याही व्यवहार, खरेदी, स्टेटमेंट, नोंदी, लॉग यांच्या परिणाम स्वरुपात यांच्या परिणामी निर्माण झालेला, त्या संदर्भातला कोणताही व्यवहार डेटा;

(c) कोणत्याही उत्पादनासाठी एचडीएफसी बँकेला अर्ज करताना किंवा विनंती करताना प्रस्तुत केलेली माहिती;

(d) क्रेडिट माहिती;

(e) एचडीएफसी बँकेने इतर कोणत्याही स्रोताकडून मिळवलेली कोणतीही माहिती;

(f) कोणताही डेरिव्हेटिव्ह डेटा.

"डेरिव्हेटिव्ह डेटा" म्हणजे कोणताही क्रेडिट स्कोअर, क्रेडिट माहिती, वर्तणुकीय अंदाज, प्रोफाइलिंग, विश्लेषणात्मक निकाल, अहवाल (एचडीएफसी बँकेने अंतर्गत किंवा इतर व्यक्तींनी तयार केलेले) ज्यामध्ये कोणत्याही अल्गोरिदम, विश्लेषण, सॉफ्टवेअर, ऑटोमेशन, प्रोफाइलिंग इत्यादींचा समावेश असतो, आणि हा डेरिव्हेटिव्ह कार्डधारकाकडून गोळा केलेल्या माहितीतून असू शकतो किंवा एचडीएफसी बँकेने किंवा इतर व्यक्तींनी इतर कोणत्याही व्यक्ती, डेटाबेस किंवा स्त्रोताकडून मिळवलेल्या इतर कोणत्याही माहितीसह एकत्रितपणे असू शकतो. वरीलपैकी कोणत्याही उप-प्रक्रिया/पद्धतींचा समावेश असलेल्या किंवा त्याद्वारे अशा डेरिव्हेटिव्ह डेटावर पोहोचण्याची आणि निर्मिती करण्याची प्रक्रिया "डेरिव्हेशन" म्हणून संदर्भात घेतली जाईल;

"एचडीएफसी बँकेची वेबसाइट" म्हणजे www.HDFCbank.com, जी एचडीएफसी बँकेच्या मालकीची, तिने संचालन केलेली आणि देखभाल केलेली आहे;

"गिफ्ट पीपीआय" म्हणजे पीपीआय मास्टर डायरेक्टर्समध्ये प्रदान केल्यानुसार पीपीआयची एक विशेष श्रेणी होय;

"सरकारी प्राधिकरण" म्हणजे कोणतेही सरकार, शासकीय विभाग, स्थानिक प्राधिकरणे (उदा. महानगरपालिका, नगरपालिका, पंचायत), मंत्रालय, आयोग, मंडळ, एजन्सी, नियामक प्राधिकरण, इन्स्ट्रूमेंटॅलिटी, न्यायालय, न्यायाधिकरण किंवा इतर ज्युडिशिअल, क्वासी-ज्युडिशिअल किंवा प्रशासकीय संस्था जिचे अधिकार क्षेत्र या प्रकरणावर किंवा प्रश्नातील बाबींवर असते;

“ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड” म्हणजे व्हर्च्युअल गिफ्ट पीपीआय ज्यावर एचडीएफसी बँकेने कार्डधारकांना या अटी आणि शर्तींनुसार दिलेल्या ‘ई-गिफ्टप्लस प्रीपेड कार्डाचे’नाव असते;

“व्यापारी” म्हणजे असे व्यापारी आणि आस्थापना ज्यांच्यासाठी बँक वस्तू आणि/किंवा सेवांच्या विक्रीचे पेमेंट स्वीकारण्यासाठी अधिग्रहणकर्ता म्हणून काम करते;

“मोबाइल डिव्हाइस” म्हणजे मोबाईल किंवा कोणतेही इलेक्ट्रॉनिक साधन ज्यामध्ये स्मार्टफोन आणि होस्ट व्हॉइस आणि डेटा ॲप्लिकेशन समाविष्ट आहेत;

“पीपीआय” म्हणजे प्रिपेड पेमेंट इन्स्ट्रूमेंट आणि त्याचा अर्थ त्याला पीपीआय मास्टर निर्देशांमध्ये दिल्याप्रमाणे असेल.

"प्रक्रिया" म्हणजे डेटावर केलेले कोणतेही कार्य किंवा कार्यांचा संच होय त्यात संग्रहण, रेकॉर्डिंग, कॉपी करणे, वापरणे, प्रोफाइलिंग, व्यवसाथपित करणे, स्ट्रक्चरींग, स्टोअरेज, अनुकूलन, रिप्रॉडक्शन, रिट्रायव्हल, वापर, अलाइनमेंट किंवा संयोजन, इंडेक्सिंग, शेअरींग, प्रसारणाद्वारे अनावरण, डिसेमिनेशन किंवा अन्यथा उपलब्ध करून देणे, प्रतिबंध, इरॅश्युअर किंवा नष्ट करणे यासारख्या कार्यांचा समावेश असतो आणि "प्रक्रिया" आणि "प्रक्रिया केलेले" या शब्दांचा अर्थ त्यानुसार लावला जाईल;

"प्रक्रिया करणारी संस्था" म्हणजे कोणतीही क्रेडिट माहिती कंपनी, ब्युरो, स्विचेस, नेटवर्क, कार्ड असोसिएशन, वित्त संस्था, सेटलमेंट, ट्रान्सफर आणि प्रोसेसिंग मध्यस्थ, पेमेंट ॲग्रीगेटर, पेमेंट गेटवे, पेमेंट सिस्टम, सेवा प्रदाते, सल्लागार, विक्रेते, एजंट, तृतीय-पक्ष उप-कंत्राटदार, फिनटेक संस्था, को-ब्रँड संस्था/ भागीदार, वितरक, विक्री/मार्केटिंग एजंट, व्यापारी, कोणताही भागीदार, सहयोगी, को-लेंडर्स, को-ऑर्गजायजर्स, व्यापारी, ॲग्रेगेटर्स, लीड जनरेटर, सोर्सिंग संस्था, क्लायंट, ग्राहक, किंवा इतर व्यक्ती ज्यांच्याशी एचडीएफसी बँकेचा कोणत्याही उत्पादनांसाठी किंवा सेवांसाठी थेट किंवा अप्रत्यक्ष व्यवस्था किंवा टाय-अप आहे, कोणतीही शाखा, प्रमुख/उपकंपनी, ॲफिलिएट, एचडीएफसी बँकेच्या समुह कंपन्या आणि सहयोगी, सरकारी प्राधिकरण, तपासणी संस्था, कोणतेही टीपीएपी (ज्यांच्यासाठी एचडीएफसी बँक पीएसपी बँक म्हणून काम करते), किंवा एचडीएफसी बँक सहभागी असलेल्या परिसंस्थेतील इतर प्लेयर्स/मध्यस्थी आणि अशा प्रक्रिया संस्थांचे सेवा प्रदाते, सल्लागार, विक्रेते इ.;

"उत्पादन" म्हणजे प्रीपेड पेमेंट इन्स्ट्रुमेंट्स आणि वॉलेट आणि/किंवा त्यांच्याशी संबंधित सेवा, जर कार्डधारक अधिकृत स्वाक्षरीकर्ता किंवा अधिकृत व्यक्ती किंवा कोणत्याही सेवांचा नॉन-इंडिव्हियज्युअल अर्जदार/ग्राहक/वापरकर्ता असेल, मग तो प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष असो समाविष्ट असतो, असे कोणतेही उत्पादन एचडीएफसी बँकेचे असो किंवा इतरांसह संयुक्तपणे असो किंवा जिथे एचडीएफसी बँक वितरक असेल किंवा रेफरल, एजन्सी किंवा इतर कोणत्याही व्यवस्थेच्या अंतर्गत येत असेल किंवा इतर व्यक्तींच्या उत्पादनांसाठी किंवा इतर कोणत्याही उत्पादनांसाठी आणि/किंवा सेवांसाठी असेल. कार्डधारकाने लागू केलेली/विनंती केलेली किंवा मिळवलेली उत्पादने (ज्यात कोणत्याही व्यवहाराची सुरुवात थेट एचडीएफसी बँकेसोबत नसून संबंधित प्रक्रिया करणा-या संस्थेसोबत होते) त्यांना "विनंती केलेली उत्पादने" म्हणून संदर्भात घेतले जाईल;

"आरबीआय" म्हणजे भारतीय रिझर्व्ह बँक;

"आरबीआय केवायसी मास्टर निर्देश" म्हणजे आरबीआयचे मास्टर निर्देश - नो युअर कस्टमर (केवायसी) डायरेक्टेशन, क्र. DBR.AML.BC.No.81/14.01.001/2015-16 दिनांक 25 फेब्रुवारी 2016, जे वेळोवेळी सुधारित, बदललेले, रिएनॅक्ट केलेले, सबस्टिट्यूट केलेले, पूरक, फेरबदल केलेले असू शकते;

“आरबीआय नियमने” म्हणजे आरबीआयसने वेळोवेळी दिलेली मार्गदर्शक तत्वे, परिपत्रके, अधिसूचना, निर्देश, मास्टर निर्देश, जे वेळोवेळी सुधारित केले , बदलले, रिएनॅक्टेट केले, सबस्टिट्यूट आणि सुधारित केले जाऊ शकतात;

"पीपीआय मास्टर निर्देश" म्हणजे रिझर्व्ह बँकेने27 ऑगस्ट 2021 रोजी दिलेला मास्टर निर्देश आहे ज्याचे शीर्षक 'प्रीपेड पेमेंट इन्स्ट्रुमेंट्सच्या वितरण आणि संचालनावरील मास्टर निर्देश' असून संदर्भ क्रमांक RBI/DPSS/2021-22/82 CO.DPSS.POLC.No.S-479/02.14.006/2021-22 आहे, जो वेळोवेळी सुधारित केला, बदललला आणि/किंवा रिस्टेट केला जाऊ शकतो;

"सेवा" म्हणजे एचडीएफसी बँकेने कार्डधारकांना दिलेल्या सेवा, ज्या कार्डधारकांना खालीलपैकी कोणत्याही मर्यादा पूर्ण करण्यास सक्षम करण्याच्या अधीन असतात: (a) ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डशी संबंधित सेवा, ज्यामध्ये मास्टर निर्देशांनुसार आणि या अटी आणि शर्तींनुसार ईगिफ्टप्लस प्रिपेड कार्डवर स्टोअर केलेले मूल्य जोडणे समाविष्ट आहे, ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डमधून अशा बँक खात्यांवर आणि/किंवा इतर अशा पीपीआयवर स्टोअर केलेले मूल्य स्थानांतरण करणे ज्यांना पीपीआय मास्टर निर्देश आणि या अटी व शर्तींद्वारे परवानगी आहे, ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड सक्षम करण्यासाठी एचडीएफसी बँकेने फीचर सक्षम केल्यानंतर लागू होणारी इंटरऑपरेबिलिटी,जिचा उपयोग एचडीएफसी बँकेच्या निर्देशांनुसार सक्षम असू शकलेल्या पेमेंट सिस्टमसो्बत उपयोगासाठी केला जातो, (b) या अटी आणि शर्तींमध्ये समाविष्ट असलेले इतर गुणविशेष, कार्यक्षमता, सेवा, (c) एचडीएफसी बँकेच्या निर्देशांनुसार वेळोवेळी सक्षम केलेल्या इतर कोणत्याही सेवा;

"नमुद केलेले उद्देश" एकत्रितपणे, जोखीम मूल्यांकन, जोखीम विश्लेषण, पोर्टफोलिओच्या संवेदनशीलतेचे विश्लेषण, फसवणूकीची तपासणी, फसवणूकीचा शोध, फसवणूकीला प्रतिबंध, गुन्हेगारी/दहशतवाद निधीसह गुन्ह्यांचा शोध घेणे आणि प्रतिबंध करणे, गैरव्यवहार किंवा विसंगत कागदपत्रे किंवा माहिती शोधणे, गैरवापर रोखणे, पात्रतेचे मूल्यांकन, आर्थिक स्थिती, योग्य परिश्रम, पार्श्वभूमीची तपासणी, भौतिक आणि इतर तपासणी, पडताळणी, वरीलपैकी कोणत्याहीसाठी कोणतेही अहवाल मिळवणे, केवायसी/एएमएलची तपासणी, ग्राहक सेवा, देखरेख, कोणतीही कायदेशीर कार्यवाही, कृती, चौकशी, तपास, कोणत्याही उपायांचा फॉलोअप करणे, अधिकारांचा कार्यान्वय, क्रेडिट रिपोर्टिंगसह अहवाल देणे, केवायसी रिपोर्टिंग, फाइलिंग, मोबाईल बँकिंग उपलब्ध करणे, इंटरनेट बँकिंग, डिजिटल बँकिंग, सोशल मीडिया बँकिंग, एसएमएस बँकिंग, इतर कोणत्याही डिजिटल आधारित बँकिंग सेवा, कोणत्याही डेबिट आणि/किंवा इतर कार्ड देणे, विविध मध्यस्थांना डेटा शेअर करणे, स्विच, नेटवर्क, कार्ड असोसिएशन, सेटलमेंट, ट्रान्सफर आणि विविध मध्यस्थांना डेटा शेअर करणे, स्विच, नेटवर्क, कार्ड असोसिएशन, सेटलमेंट, ट्रान्सफर आणि प्रोसेसिंग मध्यस्थांना, लॉयल्टी प्रोग्राम व्यवस्थापित करणा-या संस्थांना डेटा शेअर करणे, कोणत्याही ऑफर, सवलत, कॅशबॅक, चार्जबॅक, वैशिष्ट्यांचे व्यवस्थापन, निर्माण आणि/किंवा नियमन, व्यापा-यांसोबत, पेमेंट एग्रीगेटर्स, पेमेंट गेटवे, पेमेंट सिस्टीम्ससोबत टाय-अप्स, कोणत्याही कायदेशीर आणि/किंवा नियामक बाध्यतांचे, जबाबदा-या, फाइलिंग्ज, रिपोर्टिंग, इत्यादीचे प्रदर्शन, जरी यापैकी काहीही अंतर्गतपणे किंवा कोणत्याही प्रक्रिया संस्थेद्वारे केले जात असले तरी;

"कर" म्हणजे सर्व कर, सेस, सरचार्ज, ड्यूटीज, इंपोस्ट, स्टँप ड्यूटी, दर, कोणत्याही अधिकारक्षेत्रातील अशाच प्रकारच्या कोणत्याही आकारण्या ज्या कोणत्याही सरकारी प्राधिकरणाद्वारे आकारल्या /संकलित केल्या जातात/देय असतात (ज्यापैकी कोणतेही किंवा सर्व, आता किंवा भविष्यात लागू आणि/किंवा देय असू शकतात, जरी आता किंवा भविष्यात अस्तित्वात असल्या तरीदेखील), व्याज, दंड आणि वरीलपैकी कोणत्याही संबंधित इतर कोणत्याही बाध्यता, ज्यामध्ये भूतकाळातील कोणतीही दायित्वे आणि बाध्यता समाविष्ट असतात, आणि ज्या सर्व प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कर, सर्व प्रकारचे वस्तू आणि सेवा कर, टोल कर, महानगरपालिका, स्थानिक, रस्ते वाहतूक कर इत्यादींचा समावेश करुन अमर्यादित असतील;

“व्यवहार” म्हणजे ईकॉम/ऑनलाइन व्यवहार (ज्यात कार्ड-नॉट-प्रेझेंट व्यवहारांचा समावेश असतो)जे ईगिफ्टप्लस प्रिपेड कार्डांचा वापर करुन केलेले असतात.

2. स्पष्टीकरण

मजूकरास आवश्यक नसे पर्यंत या अटी व शर्तींमध्ये:

2.1. एकवचनीमध्ये अनेकवचनी आणि त्याउलट समाविष्ट आहे कोणत्याही लिंगाचे शब्द इतर लिंगांचा समावेश असणारे मानले जातात;

2.2. "यापैकी", "इथे", "याद्वारे", "इथून" आणि डेरिव्हेटिव्ह्ज किंवा त्यासारखे शब्द या अटी आणि शर्तींचा संदर्भ देतात;

2.3. "समाविष्ट करा" किंवा "समाविष्ट करुन" या शब्दांचे मर्यादेशिवाय अर्थ लावले जातील;

2.4. कोणत्याही कलमाचा संदर्भ म्हणजे या अटी आणि शर्तींचे कलम असेल;

2.4. कोणत्याही लेजिसलेशनच्या, कायद्याच्या, परिपत्रकाच्या किंवा नियमनाच्या किंवा त्याच्या कोणत्याही तरतुदीच्या संदर्भामध्ये, त्या दिनांकानंतर, वेळोवेळी सुधारणा केलेल्या, पूरक किंवा रिएनॅक्ट केलेल्या कोणत्याही लेजिसलेशनच्या, कायद्याच्या, परिपत्रकाच्या किंवा नियमनाच्या संदर्भांचा समावेश असेल आणि कायदेशीर तरतुदीच्या कोणत्याही संदर्भामध्ये, त्या तरतुदीच्या अंतर्गत वेळोवेळी केलेल्या कोणत्याही सबॉर्डिनेट लेजिसलेशनचा समावेश असेल;

2.5. "व्यक्ती" संज्ञेत व्यक्ती, भागीदारी संस्था, मर्यादित दायित्व भागीदारी, कंपनी (कंपनी अधिनियम 2013च्या कलम 2(20) मध्ये परिभाषित केल्याप्रमाणे), बॉडी कॉर्पोरेट (कंपनी अधिनियम 2013च्या कलम 2(11)मध्ये परिभाषित केल्याप्रमाणे), सहकारी संस्था, ट्रस्ट, संस्थापित असलेली किंवा नसलेली व्यक्तींची संघटना आणि इतर कोणतीही संस्थांचा समावेश असतो;

2.6. शीर्षक आणि बोल्ड टाइपफेस केवळ सोयीसाठी वापरले आहेत आणि या अटी आणि शर्तींच्या अर्थावर परिणाम करणार नाहीत.

3. ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डसाठी अर्ज करणे आणि ते देणे

3.1. ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड देण्याच्या संदर्भात, अर्जदाराने एचडीएफसी बँकेला संपूर्ण अर्ज आणि अर्जासोबत एचडीएफसी बँकेला आवश्यक असलेली माहिती/दस्तऐवज सादर करावेत, ज्यामध्ये, अमर्यादितपणे, एचडीएफसी बँकेला ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड देणे आवश्यक असलेल्या व्यक्तीच्या बाबतीत आवश्यक असलेली माहिती आणि दस्तऐवज समाविष्ट असतील.

3.2. अर्जदाराने, वरील कलम 3.1 प्रमाणे अर्ज आणि दस्तऐवज सादर करताना, ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डवर लोड करावयाच्या रकमेचे पेमेंट करावे. हे कार्ड कार्डधारकाला एचडीएफसी बँकेने या संदर्भात दिलेल्या पध्दतीने आणि लागू कायद्यानुसार (अमर्यादपणे पीपीआय मास्टर निर्देशांसह) दिले जाईल.

3.3. एचडीएफसी बँक, तिच्या एकात्मिक निर्णयाने आणि एचडीएफसी बँकेने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या अटी आणि शर्तींना पूर्ण करुन तसेच इतर औपचारिकता पूर्ण करण्याच्या अधीन राहून, कार्डधारकाला ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड देऊ शकते. अर्जदार पोचपावती देतो आणि सहमत आहे की ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड देणे हा एचडीएफसी बँकेचा एकमेव विशेष अधिकार असेल आणि या अटी आणि शर्तींमध्ये समाविष्ट असलेली कोणतीही बाब (अमर्यादपणे, अर्ज प्रस्तुतीकरण आणि/किंवा वरील कलम 3.2 नुसार ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डवर रक्कम लोड करण्यासह) एचडीएफसी बँकेला कोणत्याही कार्डधारकाला ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड देण्यास बांधिल करणारी नसेल.

3.4. एचडीएफसी बँकेने अर्जदाराने केलेला अर्ज नाकारण्याच्या स्थितीत अर्जदाराने भरलेली परतफेड करण्यायोग्य रक्कम (जर असेल तर)

एचडीएफसी बँकेकडून वेळोवेळी ज्या खात्यातून एचडीएफसी बँकेच्या नावे पेमेंट केले गेले होते त्या खात्यात किंवा आरबीआय नियमांनुसार परवानगी असलेल्या इतर ठिकाणी क्रेडिट करून परत केली जाईल. परंतु अर्जदाराने भरलेले प्रक्रिया शुल्क आणि/किंवा इतर कोणत्याही परतफेड न करण्यायोग्य रकमेची एचडीएफसी बँक परतफेड करणार नाही.

4. ईगिफ्टप्लस प्रिपेड कार्ड्सचे ॲक्टिव्हेशन/सक्रियीकरण

4.1. कार्डधारक आणि अर्जदार याद्वारे पोचपावती देतात आणि सहमत आहेत की कार्डधारकाच्या नोंदणीकृत ईमेल आयडीवर सक्रिय आणि लोड केलेल्या स्थितीत शेअर केलेले ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड वर्च्युअल वापरासाठी तयार आहे. कार्ड देण्याच्या दिनांकाप्रमाणे ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड असक्रिय(डिॲक्टिव्हेटेड) स्वरूपात असेल आणि वरील कलम 3.2च्या संदर्भात ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डवर लोड केलेले कोणतेही मूल्य या अटींनुसार ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड सक्रिय होईपर्यंत वापरता येणार नाही.

4.2. येथे काहीही दिले असले तरी, कार्डधारक आणि अर्जदार पोचपावती देतात आणि सहमत आहेत की, जर कार्डधारक आणि/किंवा अर्जदाराने दिलेल्या केवायसीमध्ये काही तफावत असण्याच्या आणि/किंवा कार्डधारक आणि/किंवा अर्जदाराने या अटी आणि शर्तींचे, आरबीआय केवायसी मास्टर निर्देश आणि/किंवा पीपीआय मास्टर निर्देशांचे पालन न करण्याच्या स्थितीत, एचडीएफसी बँकेला, तिच्या एकात्मिक निर्णयाप्रमाणे, ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड तात्काळ रद्द/निलंबित/ब्लॉक करण्याचा अधिकार असेल आणि या संदर्भात कार्डधारक आणि/किंवा अर्जदाराला झालेल्या कोणत्याही गैरसोयीसाठी ती जबाबदार नसेल.

5. ईगिफ्टप्लस प्रिपेड कार्ड्सचा कार्डधारकाने केलेला उपयोग

5.1. कार्डधारक आणि अर्जदार पोचपावती देतात आणि सहमत आहेत की:

(a) ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड फक्त भारतात आणि फक्त भारतीय रुपयांमध्ये (आयएनआर) करण्याच्या पेमेंटच्या बाबतीत वैध आहे;

(b) ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड सक्तीने स्थानांतरण करता न येणारे असोओन ती एचडीएफसी बँकेची मालमत्ता आहे;

(c) कार्डधारक कधीही कार्डावर उपलब्ध असलेल्या शिलकीच्या मर्यादेपर्यंतच ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड वापरू शकेल;

(d) ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डच्या बाबतीत कोणताही रीलोड पर्याय उपलब्ध नाही;

(e) ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डवर रोख रक्कम काढण्याची परवानगी नाही;

(f) कार्डाच्या शिलकीवर एचडीएफसी बँकेकडून कोणतेही व्याज दिले जाणार नाही;

(g) कार्डधारक आणि अर्जदार लागू असलेल्या सगळ्या कायद्यांचे पालन करतील;

(h) कार्डधारक आणि अर्जदार ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डवर मूल्य लोड करण्यासाठी एचडीएफसी बँकेने निश्चित केलेल्या आवश्यक प्रक्रिया आणि पध्दतींचे तसेच लागू असलेल्या कायद्याच्या लागू असलेल्या सर्व आवश्यकतांचे (अमर्यादपणे, पीपीआय मास्टर निर्देशांसह) पालन करण्यास सहमत आहेत;

(i) ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड फक्त भारतीय रुपयांमध्ये (आयएनआर), बँक खात्यात डेबिट करून, लिंक केलेल्या कार्डाने, इतर क्रेडिट आणि डेबिट कार्डानेरे, युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस (यूपीआय) किंवा संबंधित आरबीआय नियमांनुसार आणि बँकेद्वारे वेळोवेळी परवानगी दिलेल्या इतर

माध्यमांद्वारे आणि इतर पद्धतीने लोड करण्याची परवानगी असेल, परंतु ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डचे इलेक्ट्रॉनिक लोडिंग भारतातील नियमन केलेल्या संस्थांनी दिलेल्या वरील पेमेंट साधनांद्वारे होणे आवश्यक आहे.

(j) अर्जदार आणि/किंवा कार्डधारक पोर्टलद्वारे किंवा बँकेने वेळोवेळी परवानगी दिलेल्या इतर मार्गांनी आणि इतर पद्धतीने ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड लोड करू शकतो.

5.2. ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डचा वापर या अटी आणि शर्तींद्वारे आणि ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डच्या संदर्भात एचडीएफसी बँकेने वेळोवेळी दिलेल्या सर्व धोरणांनी, मार्गदर्शक तत्वांनी आणि सूचनांनी नियंत्रित केला जाईल. प्रत्येक वेळी कार्डधारकाने व्यवहार करण्यासाठी ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड वापरतेवेळी, कार्डधारक पोचपावती देतो आणि सहमत आहे की कार्डाच्या बॅलन्समधून व्यवहाराचे मूल्य वजा केले जाईल. कार्डधारक पोचपावती देतो आणि सहमत आहे की येथे काहीही दिले असले तरी, एचडीएफसी बँक, तिच्या सार्वभौम निर्णयाने कोणतेही कारण न देता जरी व्यवहार पूर्ण करण्यासाठी पुरेसा कार्ड बॅलन्स असला तरीही ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डाने कोणताही व्यवहार करण्यास नकार देऊ शकते.

5.3. कार्डधारक पोचपावती देतो आणि सहमत आहे की ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डाने प्रत्येक व्यवहार करण्यासाठी आणि वैधता देण्यासाठी एचडीएफसी बँकेने (स्वतः किंवा तृतीय पक्षाद्वारे)दिलेला विशेष वन टाइम पासवर्ड (ओटीपी) आवश्यक आहे. कार्डधारकाला त्यांच्या नोंदणीकृत ई-मेल ॲड्रेसवर/फोन नंबरवर ओटीपी पाठवला जाईल. कार्डधारक ओटीपी गुप्त ठेवेल आणि एचडीएफसी बँकेच्या कोणत्याही कर्मचा-याला आणि प्रतिनिधींना देखील तो सांगता कामा नये. कोणत्याही तृतीय पक्षांना ओटीपी उघड केल्यामुळे आणि/किंवा ओटीपी मिळालेल्या व्यक्तीने ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डचा गैरवापर केल्यामुळे कार्डधारकाचे कोणतेही नुकसान झाल्यास त्यासाठी एचडीएफसी बँक कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही. कार्डधारक पोचपावती देतो आणि मान्य करतो की, एचडीएफसी बँकेला कधीही कार्डधारकाने व्यवहारांचे प्रमाणीकरण करण्यासाठी इतर तंत्रज्ञानाचे पालन करण्याची आवश्यकता असू शकते आणि कार्डधारक एचडीएफसी बँकेला या संदर्भात आवश्यक असलेल्या सर्व कृती, डीड्स आणि गोष्टी करण्यास सहमत आहे आणि तसे वचन देतो. कार्डधारक हे मान्य करतो की वर नमूद केल्याप्रमाणे ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डसाठी ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डच्या ओटीपीचे संरक्षण आणि सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी अतिरिक्त आणि विशेष काळजी घेण्याची कार्डधारकाची जवाबदारी असेल आणि तडजोड, जाहिरीकरण किंवा शेअरिंगमुळे कोणत्याही कृती किंवा चुकीमुळे होणा-या कोणत्याही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष किंवा पर्यवसनात्मक किंवा इतर नुकसानासाठी बँक कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही. कार्डधारक पुढे सहमत आहे आणि पोचपावती देतो की ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डच्या ओटीपीच्या अशा जाहिरीकरणामुळे, शेअरिंगमुळे किंवा तो हरवण्यामुळे अनधिकृत व्यक्तींनी कोणतेही व्यवहार करण्याच्या स्थितीत हे सगळे व्यवहार कार्डधारकाने केले आहेत असे मानले जातील आणि अशा व्यवहारांच्या प्रक्रियेमुळे उद्भवणारी सगळी क्षती कार्डधारकाच्या खात्यात होईल आणि बँक अशा तोट्यासाठी जबाबदार राहणार नाही. बँक या संदर्भात कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही आणि ही संपूर्ण जबाबदारी आणि दायित्व कार्डधारक सहन करेल.

5.4. येथे काहीही दिले असले तरी, कार्डधारक याद्वारे सहमत आहे आणि पोचपावती देतो की लागू कायद्यांतर्गत परवानगी नसलेल्या कोणत्याही व्यवहारासाठी ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डचा वापर केला जाणार नाही.

5.5. कार्डधारकाने या गोष्टींची खात्री करेल:

i. ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड सुरक्षित ठिकाणी ठेवलेले आहे;

ii. कार्डधारकाव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीला ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड वापरण्याची परवानगी नाही;

iii. ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड मिळाल्यानंतर लगेचच त्याच्या मागच्या बाजूला स्वाक्षरी केलेली आहे;

iv. ओटीपी कधीही कोणत्याही व्यक्तीला सांगितला जात नाही किंवा इतर कोणत्याही व्यक्तीला तो सापडेल अशा ठिकाणी लिहिला जात नाही;

v. ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड कार्डधारकाच्या नोंदणीकृत ईमेल आयडी आणि/किंवा फोन नंबरवर पोहोचल्यानंतर/दिले गेल्यानंतर, ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डवरील कोणत्याही ऑनलाइन गैरवापराची जबाबदारी एचडीएफसी बँकेची नसून ती कार्डधारकाची असेल.

5.6. कार्डधारक पोचपावती देतो आणि सहमत आहे की एचडीएफसी बँक वेळोवेळी, तिच्या अंतर्गत धोरणानुसार, कोणत्याही विशिष्ट दिवशी किंवा इतर वारंवारतेनुसार केल्या जाणा-या व्यवहारांच्या रकमेवर आर्थिक मर्यादा लावू शकते. कार्डधारक पोचपावती देतो आणि सहमत आहे की जरी मर्यादा कार्डधारकाला पूर्वी सूचित केल्या असल्या किंवा नसल्या तरीही एचडीएफसी बँकेला या मर्यादा ओलांडल्यानंतर कोणत्याही व्यवहारावर प्रक्रिया करण्यास नकार देण्याचा अधिकार असेल. एचडीएफसी बँकेच्या वेबसाइटद्वारे केलेल्या कोणत्याही व्यवहारांसाठी कार्डधारकांना त्यांच्या ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डवर मर्यादा निश्चित करण्यामार्फत त्यांच्या खर्चावर नियंत्रण ठेवण्याचा पर्याय असेल. कार्डधारकांना एचडीएफसी बँकेने परवानगी दिलेल्या कोणत्याही प्रकारच्या व्यवहारांना एनेबल किंवा डिसेबल करण्याचा पर्याय देखील असेल.

5.7. कार्डधारकाला एका व्यवहाराद्वारे किंवा व्यवहारांच्या सिरीजने उपलब्ध कार्ड शिलकीचे उल्लंघन करण्याची परवानगी नाही. कार्डधारक पोचपावती देतो आणि सहमत आहे की कार्डधारक देय रक्कम कार्ड शिल्लक रकमेपेक्षा जास्त असलेला व्यवहार करण्याचा प्रयत्न करू शकणार नाही. कोणत्याही परिस्थितीत, जर कोणत्याही कारणाने, कार्ड शिल्लक रकमेपेक्षा जास्त रक्कम असलेला व्यवहार स्वीकारला गेला आणि निगेटिव्ह कार्ड बॅलन्स झाल्यास कार्डधारक अशा निगेटिव्ह कार्ड बॅलन्सच्या रकमेसाठी एचडीएफसी बँकेला पूर्णपणे देय राहील आणि एचडीएफसी बँकेने वेळोवेळी, निगेटिव्ह कार्ड बॅलन्स होण्याच्या दिनांकापासून अशा रकमेचा प्रत्यक्ष पेमेंटच्या दिनांकापर्यंत निश्चित केलेल्या व्याजदराने एचडीएफसी बँकेला त्याचे त्वरित पेमेंट करेल.

5.8. ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड वापरून केलेल्या कोणत्याही व्यवहाराची बँकेकडे नोंद आणि अचूक ओटीपी (लागू असेल तिथे) अशा रकमेसाठी कार्डधारकाने प्रत्यक्षपणे ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड वापरल्याचा निर्णायक पुरावा असेल. कार्ड बॅलन्स आणि व्यवहाराच्या इतिहासासह, वेळोवेळी पोर्टलवर किंवा बँकेने परवानगी दिलेल्या इतर माध्यमांद्वारे आणि इतर पद्धतीने ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड संबंधित माहिती ऑनलाइन पाहता येईल.

5.9. ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड प्रत्येक खरेदीसाठी व्यापारी स्थानावर/वेबसाइटवर फक्त एकदाच वापरला जात असल्याची कार्डधारकाने ही खात्री करणे आवश्यक आहे. व्यापारी आस्थापनेकडून मिळालेले शुल्क किंवा इतर पेमेंट मागणी शुल्क कार्डधारकाने योग्यरित्या घेतले आहे याचा निर्णायक पुरावा असेल, ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड हरवणे, चोरी होणे किंवा फसवणूकीने ऑनलाइन गैरवापर होणे वगळून पुराव्याचा भार कार्डधारक सहन करेल.

5.10. कोणत्याही व्यापारी/उपकरणाच्या त्रुटीमुळे किंवा संप्रेषण लिंकमधल्या त्रुटीमुळे होणा-या सर्व परताव्यांवर आणि समायोजनांवर प्रत्यक्षपणे प्रक्रिया केली जाईल आणि यथायोग्य सत्यापनानंतर तसेच संबंधित कार्ड नेटवर्क नियम आणि नियमने लागू होण्यानुसार ते खात्यात क्रेडिट केले जातील. कार्डधारक सहमत आहे की अशावेळी मिळालेले कोणतीही डेबिट केवळ ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डमधील उपलब्ध असलेली शिलकीच्या आधारावर या परतफेडीचा विचार न करता वठवली जातील.

5.11. या संदर्भात वेळोवेळी दिलेल्या ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डच्या अटी आणि शर्तींच्या अधीन राहून, अयशस्वी झालेल्या / परत केलेल्या / नाकारलेल्या / रद्द केलेल्या व्यवहारांच्या स्थितीमध्ये परतफेड (मिळलेल्या मर्यादेपर्यंत) ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डवर लागू केली जाईल, जी बँकेने ठरवलेल्या वेळेप्रमाणे निर्धारीत केली जाऊ शकते, तसेच ती ईगिफ्टप्लस कार्डवर सुरुवातीला डेबिट करुन केलेल्या पेमेंटच्या मर्यादेपर्यंत केली जाईल. परंतु, इथे काहीही म्हटले असले तरी त्याचा अर्थ असा होत नाही की असा परतावा मिळवण्याची किंवा त्यासाठी व्यापारी किंवा इतर व्यक्तींकडे मागणी करण्याची जवाबदारी किंवा दायित्व बँकेचे आहे त्याचप्रमाणे बँकेला केवळ याची खात्री करावी लागेल की जेव्हा परतावा वास्तवात मिळतो तेव्हा तो ईगिफ्टप्लस प्रिपेड कार्डाच्या थकबाकी शिलकीमध्ये क्रेडिट केले गेले आहे. परंतु, ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड वापरून केलेला आणि कार्डधारकाच्या नोंदणीकृत मोबाईल नंबर/ई-मेल ॲड्रेसवर पाठवलेला ओटीपी यशस्वीरित्या प्रमाणित करुन केलेला कोणताही व्यवहार वैध व्यवहार मानला जाईल आणि एचडीएफसी बँक अशा अधिकृत व्यवहारांच्या कोणत्याही परतफेडी/रिव्हर्सलसाठी जबाबदार नसेल.

5.12. तथापि, इतर कोणत्याही पेमेंट इन्स्ट्रुमेंटचा वापर करून अयशस्वी / परत केलेले / नाकारलेले / रद्द केलेले व्यवहार ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डमध्ये क्रेडिट केले जाणार नाहीत.

5.13. कार्ड बॅलन्स आणि ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड इतिहास यांचा समावेश असलेली ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डशी संबंधित माहिती, एचडीएफसी बँकेच्या वेबसाइटवर लॉग-इन केल्यानंतर ऑनलाइन पाहता येईल किंवा ग्राहक सेवा केंद्राला कॉल करून/लिहून माहिती मिळवता येईल. याबद्दलचा तपशील ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डच्या मागच्या बाजूला उपलब्ध असेल.

5.14. कार्डधारकाला मिळालेल्या वस्तू आणि सेवांबाबतच्या कोणत्याही वादांसाठी एचडीएफसी बँक कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही, यामध्ये दर्जा, मूल्याची वॉरंटी, डिलिव्हरीला झालेला उशीर, डिलिव्हरी न होणे, कोणत्याही वस्तू किंवा सेवा न मिळण्याचा समावेश आहे. ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड ही कार्डधारकाला सुविधांचा लाभ घेण्याच्या दृष्टीने असणारी एक सोय असून एचडीएफसी बँक वस्तू किंवा सेवांबाबत कोणतीही हमी देत नाही किंवा दर्जा, मात्रा, मूल्य, डिलिव्हरी किंवा अन्यथा, कोणतेही प्रतिनिधित्व करत नाही हे स्पष्टपणे समजून घेणे आवश्यक आहे आणि कार्डधारकाने अशा कोणत्याही वादांचे निराकरण थेट व्यापा-यासोबत करणे आवश्यक आहे.

5.15. वेळोवेळी लागू होणा-या कोणत्याही कायद्यानुसार ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड किंवा व्यवहारांवर कोणत्याही मर्यादा असल्यास, उदाहरणार्थ थकबाकी असलेल्या रकमेच्या संदर्भात, कार्डधारक एकटा असो किंवा इतरांसोबत एकत्रितपणे असो; कार्डधारकाच्या बाबतीत थकबाकी असलेल्या बँकेच्या सर्व प्रीपेड साधनांमधील क्युम्युलेटिव्ह मूल्यांचा विचार करुन बँकेला अशा मर्यादा मोजण्याचा अधिकार असेल.

5.16. कार्डधारकाने सेवांच्या ("पोर्टल") ॲक्सेस करण्यासाठी बँक पोर्टल/प्लॅटफॉर्मवर ॲक्सेस देऊ शकते.

5.17. कार्डधारक याद्वारे सहमत आहे की ते त्यांचे खाते, केवायसी तपशील आणि संपर्क माहिती नेहमी पूर्ण आणि अद्ययावत ठेवतील.

5.18. एचडीएफसी बँक कार्डधारकांना व्यवहारांसाठी अलर्ट पाठवण्यासाठी पीपीआय मास्टर निर्देशांनुसार यंत्रणा चालवू आणू शकते. कार्डधारक हे मान्य करतो की कार्डधारक एचडीएफसी बँकेने एसएमएस, नोटिफिकेशन आणि ई-मेल किंवा तिला आवश्यक वाटणा-या इतर कोणत्याही माध्यमांद्वारे पाठवलेले अलर्ट आणि इतर संप्रेषण मिळवण्यास तो संमती देत आहे.

5.19. कार्डधारक याद्वारे सहमत आहे आणि मान्य करतो की एचडीएफसी बँक कार्डधारक किंवा नॉमिनी किंवा इस्टेटला अलर्ट पाठवण्यासाठी किंवा संवाद साधण्यासाठी तृतीय पक्ष सेवा प्रदात्यांचा उपयोग करू शकते. कार्डधारक याद्वारे कॉल, एसएमएस, ईमेल आणि इतर कोणत्याही

संप्रेषणाच्या माध्यमातून त्याच्याशी संपर्क साधण्यासाठी कॉल करू नका प्राधान्ये/सेटिंग्ज किंवा तत्सम नोंदणी दुर्लक्षित करण्यास एचडीएफसी बँकेला अधिकृतता देतो.

5.20. कार्डधारक सहमत आहे आणि मान्य करतो की व्यापा-यासोबत झालेल्या कोणत्याही वादासाठी/प्रश्न/निवारण/हरकतीसाठी बँक जबाबदार नसेल आणि कार्डधारकाला केवळ संबंधित व्यापारी/सेवा प्रदात्याकडेच ही समस्या न्यावी लागेल.

5.21. कार्डधारक याद्वारे सहमत आहे आणि पोचपावती देतो की ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड वापरून केलेले सर्व व्यवहार कार्ड असोसिएशन आणि बँकेने ठरवलेल्या अटी आणि शर्तींच्या अधीन असतील.

5.22. कार्डधारक पुष्टी करतो की कार्डधारक भारताचा कायदेशीर निवासी आहे आणि भारतीय कायद्यानुसार करार करण्यास सक्षम व्यक्ती आहे. कार्डधारक पुष्टी करतो की सेवा केवळ भारताच्या हद्दीत उपयोगात आणल्या जातील आणि कोणत्याही सीमापार व्यवहारांसाठी किंवा व्यवहाराच्या अंशत: भागासाठी उपयोगात आणल्या जाणार नाहीत.

5.23. कार्डधारक या अटी आणि शर्तींचे पालन करण्यासाठी आणि बँकेने आकारलेल्या कोणत्याही शुल्कासाठी किंवा फीसाठी जबाबदार आहे.

5.24. कार्डधारक एचडीएफसी बँकेला प्रतिनिधित्व करतो की तो कोणत्याही व्यक्तीची किंवा संस्थेची तोतयागिरी करत नाही, किंवा कोणत्याही व्यक्तीची किंवा संस्थेशी त्याचे वय किंवा संबंध असत्य सांगत नाही आहे. जर हे सादरीकरण चुकीचे असल्याचे आढळले किंवा असे चुकीचे सादरीकरण दाखवून दिले गेल्यास किंवा माहितीचे सत्यापन करणे राहून गेल्यास, एचडीएफसी बँकेला कार्डधारकाच्या संमतीशिवाय किंवा कार्डधारकाला सूचित न करता सेवा किंवा तिचा कोणताही भाग काढून घेण्याचा संपूर्ण अधिकार असेल.

5.25. कार्डधारक याची देखील पुष्टी करतो की कार्डधारक ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डचा वापर या कृतींसाठी करणार नाही (त्यात सहभागी असलेल्या कोणत्याही व्यवसायांना कोणतेही पैसे देण्याचा समावेश करुन) (a) कोणत्याही बेकायदेशीर किंवा अनैतिक किंवा समाजविरोधी कृती, (b) जुगार, (c) प्रौढ साइट्स, (d) ऑनलाइन गेमिंग, (e) प्रतिबंधित सेवा, (f) लॉटरी तिकिटांसह बेटिंग, (g) परकीय चलन व्यापार आणि (h) अशा स्वरुपाच्या व्यवसायांसाठी ज्यांसाठी पेमेंट भारतातील लागू कायद्यानुसार आणि कार्ड असोसिएशनच्या नेटवर्क नियमांनुसार करता येऊ शकत नाहीत.

6. गिफ्ट पीपीआयचे (ईगिफ्टप्लस प्रिपेड कार्ड) गुणविशेष

6.1 लागू असलेल्या इतर अटी व शर्ती ज्या या अटी व शर्ती दस्तऐवजात आहेत त्या व्यतिरिक्त, खालील अटी व शर्ती गिफ्ट पीपीआयसाठी (ईगिफ्टप्लस प्रिपेड कार्ड) लागू होतील (लागू असलेल्या कायद्यातील कोणताही बदल आणि/किंवा इतर अन्य किंवा वेगळ्या किंवा सुधारीत अटी व शर्ती या संदर्भात बँकेकडून वेळोवेळी सांगितल्या किंवा नमुद केल्या जाऊ शकतात):

i. ईगिफ्टप्लस प्रिपेड कार्ड रिलोड करता येणा-या स्वरुपाचे नसेल.

ii. इथल्या 5.15 कलमाच्या अधीन राहून ईगिफ्टप्लस प्रिपेड कार्डाची कमाल रक्कम 10000/- रु.पेक्षा जास्त असू शकत नाही.

iii. कॅश-आउट किंवा रक्कम स्थानांतरणाला ईगिफ्टप्लस प्रिपेड कार्डासाठी अनुमती नाही.

iv. बँक सलग एक वर्षाच्या कालावधीसाठी किंवा आरबीआय नियमनांच्या अंतर्गत दिलेल्या अशा इतर कालावधीसाठी कोणताही आर्थिक व्यवहार न करता ईगिफ्टप्लस प्रिपेड कार्डाला निष्क्रिय करण्याचा अधिकार राखून ठेवते. सत्यापनानंतर आणि यथायोग्य परिश्रमानंतर त्याला पुन्हा सक्रिय केले जाईल.

6.2 कार्डधारक पोचपावती देतो की, ईगिफ्टप्लस प्रिपेड कार्डाचे गुणविशेष ज्यामध्ये वरील गुणविशेष बँकेने कार्डधारकाला तिने पाठवलेल्या वेलकम ईमेलमध्ये, एसएमएसमध्ये किंवा ईमेल/पोस्ट किंवा ईगिफ्टप्लस कार्ड देतेवेळी इतर कोणत्याही माध्यमाने पाठवून स्पष्टपणे सांगितले किंवा दिले आहेत आणि कार्डधारकाला ते पूर्णपणे समजले आहेत आणि तो त्याच्यासोबत बांधील राहण्यास सहमत आहे तसेच सर्व लोडिंग्ज आणि इथले इतर व्यवहार, ज्यात ईगिफ्टप्लस कार्डवर पहिल्या रकमेच्या लोडिंगचा समावेश आहे हे त्याच्या अधीन असतील.

7. ईगिफ्टप्लस प्रिपेड कार्डाच्या इतर अटी

7.1. कार्डधारकाला दिलेले ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड हे गिफ्ट पीपीआय आहे आणि त्यामुळे कार्डधारकांनी ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डचा केलेला उपयोग आरबीआयने गिफ्ट पीपीआयच्या उपयोगाबद्दल सक्तीच्या केलेल्या सर्व अटी आणि शर्तींच्या अधीन आहे, ज्यामध्ये पीपीआय मास्टर निर्देशांचा समावेश आहे.

7.2. कार्डधारक सहमत आहे की पोर्टल ॲक्सेस करण्यासाठी, कार्डधारकाच्या नोंदणीकृत मोबाईल नंबर आणि/किंवा ई-मेल ॲड्रेसवर पाठवलेल्या ओटीपीचा वापर करून किंवा बँकेने वेळोवेळी दिलेल्या इतर प्रमाणीकरण पद्धतींचा वापर करून कार्डधारकाचे प्रमाणीकरण केले जाईल.

7.3. ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डच्या प्रत्येक प्रकार / श्रेणीसाठी निर्देशित केलेल्या सर्व आर्थिक मर्यादा कार्डधारकाने सक्तीने पाळल्या पाहिजेत.

7.4. कलम 3 आणि 4मध्ये काहीही दिलेले असले तरी, ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डच्या प्रत्येक प्रकाराशी संबंधित सर्व मर्यादा बँकेने वेळोवेळी तिच्या निर्णयाने निश्चित केलेल्या लोअर सिलिंगच्या अधीन असतील, ज्यामध्ये बँकेच्या अंतर्गत जोखीम व्यवस्थापन धोरणानुसार कार्डधारकाच्या जोखीम धारणाचा विचार करणे समाविष्ट आहे, आणि ही सर्व लोअर सिलिंग्ज कार्डधारकावर बंधनकारक असतील.

7.5. इथे काहीही दिले असले तरी, वॉलेट किंवा ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डच्या प्रकारासाठी लागू असलेल्या विशिष्ट अटी आणि शर्तींसह या अटी आणि शर्ती वेळोवेळी बँकेच्या अंतर्गत मानक आणि नियमांनुसार तसेच पीपीआय मास्टर निर्देश किंवा इतर लागू कायद्यानुसार बदलल्या जाऊ शकतात आणि असे बदल कार्डधारकावर बंधनकारक असतील, ज्यामध्ये विविध क्रेडिट, डेबिट, ट्रान्सफर, पेमेंट, लोडिंग मर्यादा इत्यादींचा समावेश असतो. पीपीआय मास्टर निर्देश/लागू कायद्यातील बदल तसेच एचडीएफसी बँकेच्या वेबसाइटवर उपलब्ध असलेल्या या अटी आणि शर्तींबद्दल माहिती ठेवणे कार्डधारकाचे कर्तव्य असेल.

8. ईगिफ्टप्लस प्रिपेड कार्ड हरवणे किंवा चोरीला जाणे

ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड हरवण्याच्या किंवा चोरीला जाण्याच्या स्थितीत कार्डधारकाने कस्टमर केअरला तात्काळ हरवण्याची/चोरीची तक्रार टेलिफोनवरून करावी. अशी कोणतीही सूचना मिळाल्यावर (लेखी सूचना देऊन, वेळोवेळी एचडीएफसी बँकेने निश्चित केलेल्या माध्यमाने आणि पद्धतीने) एचडीएफसी बँक कार्डधारकाची पुरेशी तपासणी केल्यानंतर, ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड हॉटलिस्ट/रद्द/निलंबित/ब्लॉक करेल आणि त्याच्या सगळ्या सुविधा बंद करेल आणि या संदर्भात कार्डधारकाला झालेल्या कोणत्याही गैरसोयीसाठी बँक जबाबदार नसेल. ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड हरवण्याची/चोरीला गेल्याची तक्रार होईपर्यंत आणि कार्डधारकाच्या यथायोग्य तपासणीनंतर त्यानुसार निष्क्रिय/हॉटलिस्ट केलेले होईपर्यंत ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डवर येणा-या सर्व शुल्कांसाठी कार्डधारक जबाबदार असेल. पुढे, जर एचडीएफसी बँकेने वरील टप्प्याचे पालन न करण्याचे ठरवल्यासर हरवलेल्या किंवा चोरीला गेलेल्या ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डबाबतची आर्थिक जबाबदारी पूर्णपणे कार्डधारकाची असेल. ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डवर केलेल्या व्यवहाराची तक्रार करण्याच्या वेळेच्या संदर्भात किंवा हरवलेल्या/चोरलेल्या ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डच्या संदर्भात इतर कोणत्याही बाबींशी संबंधित कोणताही वाद उद्भवल्यास, एचडीएफसी बँकेचा निर्णय निर्णायक आणि कार्डधारकावर बंधनकारक असेल.

9. ईगिफ्टप्लस प्रिपेड कार्ड सरेंडर करणे/ परत करणे

9.1 कार्डधारक पोचपावती देतो आणि सहमत आहे की एचडीएफसी बँक कधीही, अशा ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डचा वैधता कालावधी पूर्ण होण्याआधी, ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड परत करण्याची मागणी करण्यास पात्र असेल. अशी मागणी केल्यावर, एचडीएफसी बँकेने या संदर्भात दिलेल्या सूचनांनुसार कार्डधारक संबंधित ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड परत करेल.

9.2 कोणत्याही कार्डधारकाच्या मृत्यूच्या स्थितीत, त्याची सूचना मिळाल्यावर एचडीएफसी बँक ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड रद्द करेल.

10. **वैधता**

10.1. खालच्या कलम 10.2 च्या अधीन राहून, ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड देण्याच्या दिनांकापासून पंधरा (15) महिन्यांच्या कालावधीपर्यंत वैध असतील.

10.2. येथे काहीही दिले असले तरी, एचडीएफसी बँकेला कार्डधारकाला आणि/किंवा अर्जदाराला सूचना देऊन किंवा न देता, कधीही, तिच्या एकात्मिक निर्णयाने, ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड रद्द / निष्क्रिय करण्याचा अधिकार असेल.

10.3. विनंती केल्यावर, कार्डधारक ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड एचडीएफसी बँक किंवा तिच्या प्रतिनिधीला परत करण्यास सहमत आहे आणि ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड रद्द / निष्क्रिय होण्यानंतर ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डचा उपयोग किंवा उपयोगाचा प्रयत्न करणार नाही.

10.4. हे ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड कायमचे बंद करण्याचा कार्डधारकाकडे पर्याय असेल. कार्डधारक पोर्टलवर हे ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड कायमचे बंद करण्याचा पर्याय वापरू शकतो. लागू असलेल्या आरबीआय नियमांच्या अधीन राहून, कार्डधारकाला कायमस्वरुपात बंद केल्यावर त्याचे/तिचे ईगिफ्टप्लस प्रिपेड कार्ड किंवा त्यातला डेटा पुन्हा ॲक्सेस करता येणार नाही आणि बंद करताना त्यातील थकबाकी असल्यास, या ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डच्या लागू मर्यादेनुसार कार्डधारकाच्या विनंतीवरुन तिचे स्थानांतरण करता येऊ शकते.

10.5. बंद होण्याच्या स्थितीत, थकबाकी रक्कम स्त्रोत खात्यात किंवा लागू असलेल्या आरबीआय नियमनांनुसार, बँकेच्या निर्णयाच्या अधीन राहून, कार्डधारकाने लागू असलेल्या केवायसी आवश्यकतांचे पालन केल्यावर संबंधित आरबीआय नियमने आणि इतर लागू कायद्यांनुसार एचडीएफसी बँकेचे समाधान झाल्यावर इतर खात्यात क्रेडिट केली जाईल.

10.6. कार्डधारक सहमत आहे आणि पुष्टी करतो की वेळोवेळी सुधारित केलेल्या 21 मार्च 2014 च्या परिपत्रकानुसार, आरबीआयच्या बँकिंग नियमन विभागाने दिलेल्या सूचनांनुसार, कोणतीही दावा न केलेली शिल्लक रक्कम ठेवीदार शिक्षण आणि जागरूकता निधी योजनेत स्थानांतरीत केली जाईल.

11. ग्राहक सेवा आणि समर्थन

कार्डधारकाला कल्पना आहे आणि तो सहमती देतो की बँक वस्तू व सेवांसाठी जवाबदार नसेल ज्या कार्डधारकाने ईगिफ्टप्लस प्रिपेड कार्ड वापरुन खरेदी केल्या आहेत. कार्डधारकाने वस्तू व सेवांच्या खरेदीसाठी निवडलेले व्यापासी सगळ्या ग्राहक सेवांसाठी जवाबदार असतील ज्या त्या वस्तू व सेवांच्या संदर्भात असतील, ज्यामध्ये ऑर्डरची पूर्तता, ऑर्डर रद्द करणे, रिटर्न्स, परतावे आणि समायोजने, रिबेट्स, कार्यात्मकता आणि वॉरंटी, तांत्रिक समर्थन, व्यापा-याचा अधिकारी, धोरणे किंवा प्रक्रियांबद्दलच्या अनुभवाबद्दलच्या समस्या समाविष्ट असतील. कार्ड असोसिएशनस आणि/किंवा अन्य संस्था जी ईगिफ्टप्लस कार्ड देते, ती त्यासंदर्भातल्या ग्राहक सेवेसाठी जवाबदार असते.

12. विवरणे आणि रेकॉर्ड्स

12.1. ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड / व्यवहारांबाबत एचडीएफसी बँकेने इलेक्ट्रॉनिक किंवा दस्तऐवज स्वरूपात ठेवलेली सर्व रेकॉर्ड्स (अमर्यादपणे, या अटी आणि शर्तींनुसार केलेल्या किंवा मिळवलेल्या पेमेंटच्या तपशीलांसह), कार्डधारक आणि अर्जदाराच्या विरोधात, निर्णायक पुरावा मानले जातील.

12.2. एचडीएफसी बँक कोणत्याही व्यवहाराच्या संदर्भात कोणत्याही कार्डधारकाला ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डच्या व्यवहार स्लिप आणि/किंवा कोणतेही विवरण देण्यासाठी जबाबदार राहणार नाही आणि कार्डधारकाला एचडीएफसी बँकेत कार्डधारकाच्या नोंदणीकृत मोबाईल नंबरवर शॉर्ट मेसेज सर्व्हिस मेसेजद्वारे / एचडीएफसी बँकेत कार्डधारकाने नोंदणी केलेल्या ई-मेल ॲड्रेसवर इलेक्ट्रॉनिक मेलद्वारे ॲलर्ट मिळतील.

12.3. कार्डधारक याद्वारे ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डच्या संदर्भात प्रत्यक्ष स्टेटमेंट न घेण्यास सहमत आहे. कार्डधारक याद्वारे सहमत आहे की जर कार्डधारकाने ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डच्या संदर्भात विवरण ई-मेलद्वारे मिळवण्याचा पर्याय निवडल्याच्या स्थितीत, नोंदणीकृत ईमेल आयडीवर हे विवरण पाठवण्याच्या स्थितीत गोपनीयतेच्या कोणत्याही उल्लंघनासाठी एचडीएफसी बँक जबाबदार नसेल. कार्डधारक मिळवलेल्या इलेक्ट्रॉनिक मेलची सत्यता पडताळून पाहेल. फसवणूक करणा-यांकडून मिळालेल्या कोणत्याही विवरणासाठी कार्डधारक आणि/किंवा अर्जदार एचडीएफसी बँकेला जबाबदार धरणार नाहीत. एचडीएफसी बँकेने पाठवलेल्या विवरणामुळे कार्डधारकाच्या कंप्युटर नेटवर्कमध्ये कोणतीही समस्या उद्भवल्यास कार्डधारक आणि/किंवा अर्जदार एचडीएफसी बँकेला जबाबदार ठरवणार नाहीत. एचडीएफसी बँकेला दिलेल्या माहितीत झालेला कोणताही बदल कार्डधारक एचडीएफसी बँकेला लेखी स्वरुपात कळवेल. चुकीच्या ईमेल ॲड्रेसमुळे आणि तांत्रिक कारणांमुळे कार्डधारकाला विवरण न मिळण्यासाठी एचडीएफसी बँक जबाबदार नसेल.

13. इंटरऑपरॅबिलिटी

एचडीएफसी बँक लागू होणा-या कायद्यांच्या आणि नियमनांच्या संदर्भाने इंटरऑपरॅबिलिटी सक्षम करु शकते, यामध्ये वेळोवेळी दिलेले पीपीआय मास्टर निर्देश समाविष्ट असतील आणि त्याचे एचडीएफसी बँकेने दिलेल्या अटी व शर्तींद्वारे नियमन होईल आणि कार्डधारक त्याने बांधील असेल.

14. क्षतीपूर्ती

एचडीएफसी बँकेने कार्डधारकाला ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड देण्याला विचारात घेऊन, कार्डधारक आणि अर्जदार याद्वारे स्पष्टपणे आणि नि:संशयपणे सहमत आहेत की एचडीएफसी बँक आणि तिचे अधिकारी, संचालक, कर्मचारी, भागधारक, एजंट, सल्लागार आणि इतर प्रतिनिधींना कोणत्याही वेळी, ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डच्या तरतुदीमुळे किंवा त्याद्वारे उद्भवणा-या, सोसाव्या लागणा-या, परिणाम स्वरुप किंवा कोणत्याही कारणामुळे घडणा-या

कोणत्याही कृती, दावे, खटले, मागण्या, कार्यवाही, तोटा, क्षती, व्यक्तीगत इजा, कॉस्ट्स, शुल्क आणि खर्चासाठी क्षतीपूर्त करत आहे, वाचवत आहे आणि निरपराध समजत आहेत, ज्यामध्ये अमर्याद स्वरुपात खालील स्थिती समाविष्ट आहेत: (a) कार्डधारक आणि/किंवा अर्जदाराचे दुर्लक्ष, चूक किंवा गैरवर्तन; (b) कार्डधारकाकडून कोणतेही चुकीचे प्रतिनिधित्व होणे किंवा कार्डधारक आणि/किंवा अर्जदाराने या अटी आणि शर्तींचे किंवा लागू असलेल्या कोणत्याही कायद्याचे उल्लंघन किंवा पालन न करणे; (c)एचडीएफसी बँकेविरुध्द कोणत्यागी तृतीय पक्षाने ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड देणे/उपयोग करणे आणि/किंवा कोणत्याही व्यवहाराच्या संदर्भातील किंवा त्याच्याशी निगडीत केलेला कोणताही दावा किंवा कार्यवाही; (d) कार्डधारक आणि/किंवा अर्जदाराच्या सूचनांनुसार एचडीएफसी बँक, तिचे अधिकारी, कर्मचारी किंवा एजंट यांनी केलेली किंवा वगळलेली कोणतीही कारवाई; आणि/किंवा (e) कार्डधारकाच्या कोणत्याही व्यवहाराशी संबंधित फसवणूक किंवा अप्रामाणिकपणा.

15. दायित्वापासून वगळणे

या अटी आणि शर्तींमधील इतर कोणत्याही तरतुदींचा पूर्वग्रह न ठेवता, एचडीएफसी बँक कार्डधारक आणि/किंवा अर्जदाराला या अटी आणि शर्तींशी संबंधित कोणत्याही किंवा कोणत्याही प्रकारे झालेल्या किंवा उद्भवलेल्या कोणत्याही क्षतीसाठी जबाबदार राहणार नाही, ज्यामध्ये अमर्यादपणे, पुढील बाबींमुळे उद्भवणारी कोणतेही क्षती किंवा नुकसान समाविष्ट आहे: (a) कोणत्याही व्यक्तीने ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड वठवण्यास किंवा स्वीकारण्यास नकार देणे; (b) ऑनलाइन गैरवापर; (c) ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड परत करताना कार्डधारकाने किंवा अर्जदाराने एचडीएफसी बँकेच्या प्रतिनिधीव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीला ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड देणे; (d) ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डच्या ॲक्सेसमध्ये आणि/किंवा वापरात कार्डधारकाच्या ॲक्सेसमध्ये आणि/किंवा वापरात कोणताही व्यत्यय येणे.

16. शुल्क

16.1. एचडीएफसी बँक ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डाचा उपयोग करण्यासाठी फी आणि इतर शुल्क आकारण्यास पात्र असेल, कार्डधारक आणि अर्जदारासाठी ही शुल्के एचडीएफसी बँकेच्या वेबसाइटवर वेळोवेळी एचडीएफसी बँकेद्वारे निश्चित केली जातील. कार्डधारक आणि अर्जदार अशा शुल्कांचे पेमेंट करण्यास सहमत आहेत.

16.2. ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डाचा उपयोग केल्यामुळे देय असलेले कोणतेही कर, सरकारी शुल्क, ड्यूटी किंवा डेबिट केवळ कार्डधारक/अर्जदारालाच सहन करावे लागतील आणि ते एचडीएफसी बँकेवर (प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे) आकारले जाण्याच्या स्थितीत, कार्डधारक/अर्जदार याद्वारे अशा शुल्कांचे पैसे देण्यास आणि/किंवा बँकेला परतफेड करण्यास/देण्यास सहमत आहे.

16.3. कार्डधारक/अर्जदाराच्या ईगिफ्टप्लस कार्ड आणि त्याच्या वापराच्या संदर्भात देय असलेली फी, शुल्के, ड्यूटी किंवा कर भरण्याच्या दायित्वाचा पूर्वग्रह न ठेवता, कार्डावरील उपलब्ध शिल्लक रक्कम डेबिट करून आणि/किंवा कार्डधारक/अर्जदाराच्या खात्यातून आणि/किंवा इतर कोणत्याही खात्यातून देय रक्कम डेबिट करून एचडीएफसी बँक कार्डधारक/ अर्जदाराकडून एचडीएफसी बँकेला देय असलेल्या सर्व रकमा वसूल करण्यास पात्र असेल, ज्यामध्ये अमर्यादपणे वरील कलम 16.1 आणि कलम 16.2 नुसार देय असलेल्या रकमा समाविष्ट आहेत.

16.4. कार्डधारक ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डच्या उपयोगासाठी आणि सेवा मिळविण्यासाठी लागू/देय आणि/किंवा होणारे सर्व खर्च देण्यास जबाबदार असेल.

17. वाद आणि तक्रार निवारण

17.1. ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड वापरून कार्डधारकाने खरेदी केलेल्या वस्तू आणि सेवांच्या संबंधातील कोणत्याही वादांसाठी एचडीएफसी बँक कोणत्याही प्रकारे जबाबदार नसेल, ज्यामध्ये अमर्यादपणे, दर्जा, मूल्य, वॉरंटी, डिलिव्हरीला उशीर होणे, डिलिव्हरी न होणे, कोणत्याही वस्तू किंवा सेवा न मिळण्याचा समावेश होतो. ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड कार्डधारकाला व्यापा-यांना पैसे देण्यासाठी उपलब्ध असलेले एकमेव साधन आहे आणि कार्डधारकाने खरेदी केलेल्या वस्तू किंवा सेवेशी संबंधित कोणतेही वाद, कोणत्याही कारणास्तव उद्भवल्यास,त्याचे कार्डधारकाने थेटव्यापा-यासोबत निराकरण केले पाहिजेत आणि त्यासाठी एचडीएफसी बँकेचे कोणतेही दायित्व किंवा जबाबदारी नसेल.

17.2. एचडीएफसी बँक कार्डधारक आणि अर्जदाराला यामुळे थेट किंवा अप्रत्यक्षपणे झालेल्या कोणत्याही तोट्यासाठी किंवा क्षतीसाठी जवाबदार असणार नाही: (a) कार्डधारकाच्या/अर्जदाराच्या मोबाईल फोन नंबरचा कोणताही अनधिकृत वापर; (b) सर्व किंवा कोणत्याही अलर्टवर कारवाई करण्यास एचडीएफसी बँकेची कोणतीही त्रुटी, चूक, विलंब किंवा दुर्बळता; (c) प्रसारणात कोणतीही माहिती/सूचना/ॲलर्ट गमावणे; (d) दुस-या व्यक्तीद्वारे अनधिकृत ॲक्सेस किंवा मी दिलेली कोणतीही सूचना किंवा गोपनीयतेचे उल्लंघन

17.3. कार्डधारक व्यवहारात कोणत्याही अनियमितता किंवा विसंगती उद्भवल्यास किंवा कार्डधारकाला व्यवहाराबाबत काही प्रश्न किंवा तक्रार असल्यास हा व्यवहार घडल्याच्या 45 (पंचेचाळीस) दिवसांच्या आत कस्टमर केअरला कळवून एचडीएफसी बँकेला सूचित करेल. जर कोणताही व्यवहार झाल्यापासून ४५ (पंचेचाळीस) दिवसांच्या आत कोणतीही माहिती मिळाली नाही, तर संबंधित व्यवहार कोणत्याही अनियमितता/विसंगतीशिवाय झाला आहे असे गृहीत धरून पुढे जाण्याचा एचडीएफसी बँकेला अधिकार असेल.

17.4. या अटी आणि शर्तींच्या संदर्भात कार्डधारक आणि/किंवा अर्जदाराने उपस्थित केलेल्या कोणत्याही तक्रारी/प्रश्नांच्या स्थितीत, कार्डधारक आणि/किंवा अर्जदाराने एचडीएफसी बँकेला या संदर्भात आवश्यक असलेली सर्व माहिती आणि दस्तऐवज तात्काळ देणे आवश्यक आहे.

17.5. एस्केलेशन मॅट्रिक्ससह ग्राहक सेवा संपर्क तपशील एचडीएफसी बँकेच्या वेबसाइटवर [•] इथे दिला आहे.

17.6. या अटी आणि शर्तींच्या संदर्भात कार्डधारकाने उपस्थित केलेल्या कोणत्याही तक्रारी/प्रश्नांच्या स्थितीत, कार्डधारकाने एचडीएफसी बँकेला या संदर्भात आवश्यक असलेली सर्व माहिती आणि दस्तऐवज त्वरित देणे आवश्यक आहे.

17.7. जर कार्डधारक एचडीएफसी बँकेने दिलेल्या निर्णयावर समाधानी नसेल, तर कार्डधारक तक्रार निवारणासाठी रिझर्व्ह बँक - एकात्मिक लोकपाल योजनेचा उपयोग करुन घेऊ शकेल. ही योजना आरबीआय वेबसाइटवर https://cms.rbi.org.in या लिंकवर उपलब्ध आहे.

17.8. कार्डधारक पोचपावती देतो की त्याने एचडीएफसी बँकेचे ग्राहक संरक्षण धोरण वाचले आहे आणि समजून घेतले आहे, ज्यामध्ये कार्ड किंवा प्रमाणीकरण डेटा हरवल्यास किंवा चोरीला गेल्यास किंवा कोणताही फसवणूक / गैरवापर आढळल्यास कारवाई करण्याची प्रक्रिया तसेच ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड्सशी संबंधित अनधिकृत / फसव्या व्यवहारांच्या बाबतीत ग्राहकाचे दायित्व निश्चित करण्याची रक्कम आणि प्रक्रिया समाविष्ट आहे, जी बँकेच्या वेबसाइटवर [•] येथे उपलब्ध आहे. हे फ्रेमवर्क इथे समाविष्ट केलेल्या व्यवहार आणि सेवांना आवश्यकतेनुसार परिवर्तीतपणे आवश्यक ते फेरफार करुन लागू होईल.

17.9. एचडीएफसी बँकेच्या वेबसाइटवर अनधिकृत व्यवहारांची तक्रार करण्यासाठी खालील लिंक अपडेट केली आहे: [•]

17.10. कार्डधारक एचडीएफसी बँकेकडून वेळोवेळी केल्या जाणा-या कोणत्याही बदलांबद्दल अपडेट आणि माहित करण्याची जबाबदारी घेतो.

17.11. कृपया लक्षात ठेवा की एचडीएफसी बँक आपल्या ग्राहकांना कोणतीही गोपनीय माहिती विचारत नाही आणि म्हणूनच कार्डधारक आणि/किंवा अर्जदाराने अमर्यादपणे पासवर्ड, वापरकर्ता-आयडी इत्यादींसह गोपनीय स्वरूपाची कोणतीही माहिती, तिची विचारणा करणा-या कोणत्याही व्यक्तीला शेअर करू नये. आमच्या तक्रार प्रक्रियेबद्दल संपूर्ण माहितीसाठी, कृपया एचडीएफसी बँकेची वेबसाइट पहा.

18. माहिती अनावरणासाठी अनुमती /माफी देणे

18.1. कार्डधारक आणि अर्जदार याद्वारे एचडीएफसी बँक आणि/किंवा त्यांच्या सहयोगींना कार्डधारकाच्या आणि/किंवा अर्जदाराच्या कार्यालयात/घरी कोणतीही माहिती किंवा अन्यथा पडताळण्यासाठी किंवा कार्डधारकाला (आणि/किंवा अर्जदाराला)/कार्डधारकाच्या नियुक्तीकर्त्याला (आणि/किंवा अर्जदाराच्या नियुक्तीकर्त्याला)/बँकरला/क्रेडिट ब्यूरोंना/आरबीआय किंवा इतर कोणत्याही स्त्रोतांना सदस्यत्वाच्या आवश्यकतांची किंवा कार्डधारकाच्या/अर्जदाराच्या खात्याची चांगल्या क्रेडिट पत राखण्यासाठी पुष्टी करण्यासाठी आवश्यक असलेली माहिती मिळवण्यासाठी किंवा देण्यासाठी आणि राखण्यासाठी संपर्क करण्यास अधिकृतता देत आहे.

18.2. कार्डधारकाने एचडीएफसी बँकेची गोपनीयता सूचना वाचली, समजून घेतली आणि याद्वारे स्वीकारली आहे (जी www.hdfcbank.com वर उपलब्ध आहे).

18.3. कार्डधारक एचडीएफसी बँकेला डेटा किंवा त्याच्या कोणत्याही भागावर कोणत्याही विशिष्ट उद्देशांसाठी प्रक्रिया करण्याची अधिकृतता देत आहे, या अभिव्यक्तीत त्याचे वारस आणि असाइन्स समाविष्ट आहे:

i. कोणत्याही विनंती केलेल्या उत्पादनासाठी अर्ज/विनंतीचे मूल्यांकन किंवा प्रक्रिया करण्याच्या संदर्भात, किंवा कोणताही करार करण्यापूर्वी कोणतीही पावले उचलण्यासाठी, किंवा विनंती केलेल्या उत्पादनांसाठी पात्रता निर्धारणासाठी, किंवा करार/व्यवहाराच्या कार्यान्वय किंवा प्रगतीच्या संदर्भात, एचडीएफसी बँक किंवा कार्डधारक किंवा कोणत्याही कराराचे किंवा त्याच्या भागाचे इतर कोणतेही मध्यस्थ किंवा कोणत्याही नियामक किंवा कायदेशीर बाध्यता ज्या मिळवलेल्या कोणत्याही उत्पादनाच्या संदर्भात किंवा त्याच्या अनुसरणाच्या संदर्भात आहेत;

ii. डेरिव्हेशनच्या संदर्भात आणि वरील उद्देशांच्या संदर्भात कोणताही डेरिव्हेटिव्ह डेटा (एचडीएफसी बँक आणि कोणत्याही प्रक्रिया करणा-यअ संस्थेदरम्यानचा) शेअर करण्याबद्दल;

iii. ईमेल, पोस्टल पत्ता, टेलिफोन, सोशल मीडिया, अर्ज/इलेक्ट्रॉनिक प्लॅटफॉर्मवरील बॅनर, नोटिफिकेशन्स, वेबसाइट, तृतीय पक्ष/इतर व्यक्तींच्या परिसरार संपर्क करणे, संपर्क, ठावठिकाणा स्थापित करण्याच्या संदर्भात, खात्याच्या कामगिरीचे निरीक्षण करण्यासाठी किंवा संशयास्पद कृती, व्यवहार, फसवणूकीचा शोध, प्रतिबंध, अहवाल देणे, इतरांना सतर्क करण्यासारख्या बाबींच्या निरीक्षणासाठी;

iv. कोणतेही विश्लेषण, स्वयंचलित प्रक्रिया, अल्गोरिदम, रोबोटिक्स, प्रोफाइलिंग, एन्क्रिप्शन, कोडिंग, ॲनोनमायजेशन्स लागू करण्याच्या संदर्भात जे वरीलपैकी कोणासाठीही असतील.

18.4. कार्डधारक कोणत्याही विशिष्ट उद्देशांसाठी डेटा किंवा त्याच्या कोणत्याही भागावर प्रक्रिया करण्यासाठी प्रक्रिया करणा-या संस्थांना अधिकृतता देतो.

18.5. वर नमूद केलेल्या अनुमती, अधिकृतता आणि उद्देशांसाठी, असे मानले जाईल की कार्डधारकाने येथे सर्व डेटा स्वतंत्रपणे प्रदान केला आहे.

18.6. कार्डधारक पुष्टी करतो की दिलेला डेटा आणि कार्डधारक वेळोवेळी देणार असलेला डेटा सर्व बाबतीत अचूक, अद्ययावत आणि संपूर्ण आहे.

18.7. कार्डधारक सहमत आहे की निर्दिष्ट उद्देशांसाठी वर दिलेल्या अनुमती/अधिकृतता अशा अर्जाच्या/उत्पादनाच्या कालावधीच्या/कोणत्याही व्यवहाराच्या समाप्तीच्या वैधतेपलिकडे, निर्दिष्ट उद्देशांपैकी कोणताही टिकून असेपर्यंत राहतील.

18.8. या दस्तऐवजाअंतर्गत दिलेल्या किंवा नाकारलेल्या अनुमती मिळवलेल्या किंवा दिलेल्या इतर कोणत्याही अनुमतींना मर्यादित करत नाहीत.

18.9.1. कार्डधारक मान्य करतो आणि पुष्टी करतो की सर्व निर्दिष्ट उद्दिष्टे कायदेशीर उद्दिष्टे आहेत.

18.10. कार्डधारक पुष्टी करतो की कार्डधारक ही अनुमती दुस-या कोणत्याही व्यक्तीच्या दबावाशिवाय, प्रभावाशिवाय किंवा जबरदस्तीशिवाय मुक्तपणे देत आहे आणि ही संमती एक माहितीपूर्ण आणि बिनशर्त संमती आहे.

18.11. कार्डधारकाला कल्पना आहे आणि तो सहमत आहे की निर्दिष्ट उद्दिष्टांसाठी डेटावर प्रक्रिया करणे आवश्यक आहे.

18.12. कार्डधारक या वास्तवाची पोचपावती देतो की ही संमती मागितली गेली आहे किंवा कार्डधारक ही संमती देत कोणत्याही मर्यादेने किंवा कोणत्याही पार्श्वभूमीच्या किंवा आधाराच्या पूर्वग्रहाने देत नाही जे एचडीएफसी बँक किंवा कोणत्याही प्रक्रिया करणा-या संस्थांना संमतीशिवाय डेटा प्रक्रिया करण्यासाठी आहेत आणि ही संमती अशा इतर कोणत्याही आधार किंवा आधाराचा अपमान करत नाही आणि अशा कोणत्याही आधार किंवा आधाराव्यतिरिक्त आहे. स्पष्टतेसाठी, जरी ही संमती काढून घेतली गेली तरीही, एचडीएफसी बँक आणि/किंवा प्रक्रिया करणा-या संस्था विनंती केलेल्या उत्पादनांच्या संदर्भातल्या कराराच्या प्रदर्शनासाठी किंवा करारानुसार कोणतीही कारवाई करण्यासाठी किंवा त्यानुसार एचडीएफसी बँकेच्या कायदेशीर हितांचे रक्षण करण्यासाठी किंवा जेव्हा ही संमती प्रक्रिया करण्यासाठी एकमेव आधार किंवा आधार नसताना डेटा प्रक्रिया करणे सुरू ठेवू शकतात.

18.13. कार्डधारक पोचपावती देतो की या अनुमतीच्या आधारे एचडीएफसी बँक विनंती केलेल्या उत्पादनांच्या संदर्भात करार करू शकते आणि कराराच्या उद्देशांसाठी डेटावर प्रक्रिया करणे आवश्यक आहे आणि असेल, कार्डधारकाने ही संमती मागे घेतल्यावर देखील एचडीएफसी बँक आणि/किंवा प्रक्रिया करणा-या संस्थांना कराराच्या उद्देशांसाठी डेटा प्रक्रिया करणे सुरू ठेवण्यापासून रोखले जाणार नाही.

18.14. कार्डधारक व्हाट्सॲप, एसएमएस, ॲप्स, इन-ॲप नोटिफिकेशन, नोटिफिकेशन आणि ई-मेल, सोशल मीडिया किंवा एचडीएफसी बँकेने आवश्यक मानलेल्या इतर कोणत्याही माध्यमांद्वारे संप्रेषण प्राप्त करण्यास संमती देतो.

18.15. कार्डधारक आणि अर्जदार एचडीएफसी बँकेला कार्डधारक/अर्जदार किंवा कार्डधारक/अर्जदाराचा प्रतिनिधी आणि एचडीएफसी बँकेच्या प्रतिनिधी यांच्यामधली तक्रारीशी संबंधित संभाषणे किंवा पेमेंट वसुलीशी संबंधित संभाषणे किंवा एचडीएफसी बँकेला योग्य वाटेल अशा इतर कोणत्याही संभाषणाच्या बाबतीत, स्वतःच्या निर्णयानुसार, विशिष्ट संभाषणे रेकॉर्ड करण्यास अधिकृत करतात.

18.16. कार्डधारक आणि अर्जदार याद्वारे विपणन/क्रॉस-सेलिंग उद्देशासाठी टेलिफोन/मोबाईल/शॉर्ट मेसेज सेवा/ई-मेल किंवा इतर अन्य माध्यमाने एचडीएफसी बँक आणि/किंवा तिच्या एजंट्सकडून माहिती/सेवा मिळवण्यासाठी अनुमती देतो.

18.17. कार्डधारक याद्वारे सहमत आहे आणि कबूल करतो की सेवा देण्यासाठी, बँक कार्डधारकाच्या मोबाईल डिव्हाइसवर कुकीज/टोकन किंवा इतर डेटा पाठवू शकते आणि नोंदणी करताना कार्डधारकाच्या मोबाईल डिव्हाइसवरून एसएमएस सुरू करू शकते आणि कार्डधारक याद्वारे बँकेला या संदर्भात आवश्यक असलेला डेटा पाठविण्यास आणि असे एसएमएस सुरू करण्यास स्पष्टपणे अधिकृत करतो.

18.18. कार्डधारक याद्वारे सहमत आहे की कार्डधारक पोर्टल आणि/किंवा नेटबँकिंगद्वारे बँकेकडे नोंदणीकृत असलेला त्याचा/तिचा मोबाईल नंबर आणि/किंवा ईमेल ॲड्रेस पीपीआयसाठी बदलू शकतो. बँक बँकेकडे नोंदणीकृत असलेल्या कार्डधारकाच्या वर्तमान मोबाईल नंबर आणि/किंवा ईमेल ॲड्रेसवर ओटीपी पाठवून अशा विनंतीचे प्रमाणीकरण करू शकते. कार्डधारक याद्वारे सहमत आहे आणि पुष्टी करतो की अशा बदलानुसार, नवीन मोबाईल नंबर आणि/किंवा ईमेल ॲड्रेस बँकेच्या नोंदीत कार्डधारकाचा नोंदणीकृत मोबाईल नंबर आणि पीपीआयसाठी नोंदणीकृत ईमेल ॲड्रेस ("सुधारित नोंदणीकृत संपर्क") म्हणून नोंदवला जाईल आणि भविष्यातील कोणतेही संप्रेषण, ओटीपी इत्यादी बँक अशा सुधारित नोंदणीकृत संपर्कांवर पाठवू शकते आणि त्यासंदर्भात कार्डधारकाच्या कोणत्याही नुकसानासाठी बँक जबाबदार नसेल.

19. नियमन करणारा कायदा आणि न्यायाधिकरण

या अटी आणि शर्तींची रचना आणि वैधता सर्व बाबतीत भारतीय' कायद्यांद्वारे नियंत्रित केली जाईल. कार्डधारक आणि अर्जदार सहमत आहेत की या अटी आणि शर्तींमुळे उद्भवणारी कोणतीही कायदेशीर कारवाई किंवा कार्यवाही मुंबई येथील न्यायालये किंवा न्यायाधिकरणांसमोर आणली जाईल आणि ते अटळपणे त्या न्यायालयाच्या किंवा न्यायाधिकरणाच्या अधिकारक्षेत्रात स्वतःला सादर करतील. तथापि, एचडीएफसी बँक तिच्या एकात्मिक निर्णयाने, या अटी आणि शर्तींमुळे उद्भवणारी कोणतीही कायदेशीर कारवाई किंवा कार्यवाही इतर कोणत्याही न्यायालय, न्यायाधिकरण किंवा इतर योग्य मंचात सुरू करण्याचा पर्याय निवडू शकते आणि कार्डधारक आणि अर्जदार याद्वारे अशा अधिकारक्षेत्राला संमती देतात आणि कार्डधारक आणि अर्जदाराला आता किंवा भविष्यातील अशा कोणत्याही कायदेशीर कारवाई किंवा कार्यवायांचे ठिकाण मांडण्यावर असलेला कोणताही आक्षेप आणि अशी कोणतीही कायदेशीर कारवाई किंवा कार्यवाही गैरसोयीच्या मंचात आणली गेली आहे असा कोणताही दावा रद्द करतात.

20. सेट-ऑफ आणि लीन

या अटी आणि शर्तींमध्ये किंवा इतर कोणत्याही दस्तऐवजात/व्यवस्थेत काहीही दिले असले तरी: (a) कार्डधारकाच्या आणि अर्जदाराच्या एचडीएफसी बँकेवरील सर्व आणि कोणत्याही वर्तमान आणि भविष्यातील दायित्वांच्या बाबतीत, या दस्तऐवजाच्या अंतर्गत किंवा इतर कोणत्याही दायित्वाच्या/कर्ज/सुविधा/देयाच्या/दस्तऐवजांच्या संदर्भात, अशी दायित्वे स्पष्ट आहेत/असतील, प्रत्यक्ष किंवा आकस्मिक असतील, प्राथमिक किंवा कोलॅटरल असतील किंवा भिन्न किंवा इतरांसह संयुक्तपणे असतील, मुख्य कर्जदार म्हणून असतील आणि/किंवा हमीदार म्हणून असतील अथवा आणि/किंवा अन्यथा असतील (एकत्रितपणे "दायित्वे"), कोणत्याही सर्वसामान्य लीन किंवा तद्समान अधिकाराच्या व्यतिरिक्त ज्याने एचडीएफसी बँक लागू कायद्याने, कार्याने, प्रथेने किंवा अन्यथा बँकर म्हणून कार्डधारक आणि अर्जदाराच्या सर्व वर्तमान आणि भविष्यातील स्टॉक, शेअर्स, सिक्युरिटीज, मालमत्ता, बुक डेब्ट्स, सर्व खात्यांमधील सर्व पैसे, चालू, बचत, ओव्हरड्राफ्ट, फिक्स्ड किंवा इतर ठेवींवर, विशिष्ठ आणि विशेष लीन बाळगून असेल मग ते एचडीएफसी बँकेकडे आता असतील किंवा भविष्यात असतील, मग ते कार्डधारक आणि अर्जदाराच्या त्याच किंवा वेगळ्या क्षमतेत असतील आणि स्वतःत्र किंवा इतरांसोबत संयुक्त प्रकारे असतील, कोणत्याही बँकिंग संबंधासाठी, सुरक्षित कस्टडीत, संकलनासाठी किंवा अन्यथा असतील, आणि (b) स्वतंत्रपणे, एचडीएफसी बँकेला कार्डधारक आणि अर्जदाराच्या सूचनेशिवाय आणि अनुमतीशिवाय, सर्व खात्यांमधील अशा सर्व रकमा (परिपक्वतेआधी किंवा एचडीएफसी बँकेच्या निर्णयाने परिपक्वतेवर), सिक्युरिटीज, रक्कम आणि मालमत्ता (कोणत्याही विशिष्ट दायित्वासाठी राखीव असो वा नसो) कोणत्याही वसूल करण्याच्या किंवा कोणत्याही दायित्वांच्या संदर्भातल्या कोणत्याही देयाच्या उद्देशाने सेट-ऑफ, स्थानांतरण, विक्री, वसूल, समायोजन, ॲप्रॉप्रिएट करण्याचा स्पष्ट अधिकार असेल तसेच कार्डधाराकाची सर्व किंवा कोणतीही खाती एकत्रित करण्याचा आणि कोणतीही रक्कम सेट-ऑफ करण्याचा अधिकार असेल, मग ती एकाच प्रकारची किंवा स्वरुपाची असेल किंवा नसेल आणि ती त्याच क्षमतेत ठेवलेली असेल किंवा नसेल तिच्यामध्ये अशा दस्तऐवजांच्या स्थितीत देय असताना दायित्वाच्या कोणत्याही भागाच्या पेमेंटमध्ये चूक होण्याचा समावेश होतो.

21. बदलांची सूचना

21.1. एचडीएफसी बँकेला कधीही ठोस निर्णय घेता येईल (a) या अटी व शर्तींना बदलण्याचा किंवा जोडण्याचा; आणि/किंवा (b) ईगिफ्टप्लस प्रिपेड कार्डाने

देऊ केलेल्या कोणत्याही फीचर आणि/किंवा लाभात बदल करण्याचा, यामध्ये अमर्यादपणे असे बदल समाविष्ट होतात जे शुल्कांवर किंवा दरांवर आणि/किंवा ईगिफ्टप्लस प्रिपेड कार्डाच्या संदर्भात शुल्काचे गणन करण्याच्या पध्दतीवर परिणाम करतात.एचडीएफसी बँक सुधारीत अटी, ईगिफ्टप्लस प्रिपेड कार्डाच्या फीचर्समधले बदल कळवेल आणि व्याजाची, शुल्काची तसेच ईगिफ्टप्लस प्रिपेड कार्डाच्या संदर्भातल्या दरांची उजळणी करेल, जे एचडीएफसी बँकेच्या वेबसाइटवर किंवा वेळोवेळी एचडीएफसी बँकेने ठरवलेल्या इतर अन्य प्रकारे कळवले जाईल. कार्डधारक आणि अर्जदार एचडीएफसी बँकेच्या वेबसाइटवर वेळोवेळी पोस्ट केल्या जाणा-या अटी व शर्तींच्या लेटेस्ट आवृतीची नियमितपणे उजळणी करण्यासाठी जवाबदार असतील. अटी व शर्तींच्या लेटेस्ट आवृतीने स्वत:ला अपडेट ठेवणे ही कार्डधारकाची जवाबदारी असून एचडीएफसी बँकेला कार्डधारकाला कोणत्याही बदलांना, रद्दीकरणांना किंवा या अटी व शर्तींच्या अतिरिक्ततांना न कळवण्यासाठी जवाबदार धरले जाणार नाही.

21.2. कार्डधारक आणि अर्जदार हे पोचपावती देतात, सहमत आहेत आणि पुष्टी करतात की एचडीएफसी बँक, या अटी आणि शर्ती आणि / किंवा ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डच्या संदर्भात, योग्य वाटेल अशा व्यवसाय प्रतिनिधी / तृतीय पक्ष उप-कंत्राटदार / एजंट / सेवा प्रदात्यांचा वापर करू शकते.

21.3. कार्डधारक आणि अर्जदार पोचपावती देतात, सहमत आहेत आणि पुष्टी करतात की कार्डधारक आणि अर्जदार यांनी एचडीएफसी बँकेच्या वेबसाइटवर (https://www.hdfcbank.com/assets/pdf/Customer-Protection- Policy.pdf) उपलब्ध असलेले एचडीएफसी बँकेचे ग्राहक संरक्षण धोरण वाचले आहे आणि समजून घेतले आहे आणि ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डचा कार्डधारकाच्या व्यतिरिक्त वापर करण्याच्या स्थितीत कोणत्याही मर्यादेशिवाय आंतर्भाव करुन त्याची पोचपावती देतात आणि त्यासोबत बांधिल असल्याचे मान्य करतात.

21.4. कार्डधारक आणि अर्जदार पोचपावती देतात, सहमत आहेत आणि पुष्टी करतात की या अटी आणि शर्ती केवळ एचडीएफसी बँक आणि कार्डधारक/अर्जदार दरम्यान असून इतर कोणत्याही तृतीय पक्षाला याअंतर्गत कोणतेही अधिकार किंवा दायित्वे नाहीत.

21.5. अर्जदार, बिनशर्त आणि अट्ळपणे, स्वीकारतो आणि पुष्टी करतो की अर्जदाराने अटी आणि शर्ती वाचल्या आहेत आणि समजल्या आहेत आणि खालील "मी स्वीकारतो" पर्यायावर क्लिक करून अर्जदाराचा अटळ करार दर्शवित आहे. अर्जदार एचडीएफसी बँकेला अशा इलेक्ट्रॉनिक रेकॉर्डचा पुरावा म्हणून वापर करण्यास अधिकृतता देतो आणि या भेटवस्तूंना स्वीकारतो.

21.6. कार्डधारक ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड वापरून अटी आणि शर्ती स्वीकारतो आणि ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्डच्या पहिल्या वापरावर, अटी आणि शर्ती ईगिफ्टप्लस प्रीपेड कार्ड आणि या भेटवस्तूंच्या विषयाच्या संदर्भात कार्डधारक आणि एचडीएफसी बँकेमधील कराराचे प्रतिनिधित्व करतील.

22. असाइनमेंट

22.1. या अटी आणि शर्ती आणि कोणतेही अधिकार आणि इथे दिलेले परवाने, आर्डधारकामार्फत स्थानांतरीत किंवा असाइन केले जाऊ शकत नाही, पण बँकेकडून कोणत्याही मर्यादेशिवाय असाइन केले जाऊ शकतात.

22.2. बँकेने नवीन सेवा देण्याचे ठरवल्यास किंवा कोणत्याही अथवा सर्व सेवांसाठी उप-कंत्राटदार देण्याचे ठरवल्याच्या स्थितीत, कार्डधारकाला त्यासाठी कोणताही आक्षेप नसेल. कार्डधारक याद्वारे बँकेला त्याचे क्रेडिडेंशिअल्स, डेटा शेअर करण्याची आणि नवीन सेवा प्रदात्याला डेटा देण्याची अनुमती देत आहे.

अस्वीकार: वरील दस्तैवज ओरिजिनल इंग्लिश आवृत्तीचं भाषांतर आहे. मजकुरात काही विसंगती असल्यास इंग्लिश आवृत्ती अंतिम मानली जाईल. कोणत्याही चौकशीसाठी कृपया स्थानिक एचडीएफसी बँकेच्या शाखेत भेट द्या.